## NEXT MEETING

Date : 8/08/2018

Time : 5.30 pm.

Sub : **Rotary's Global Hub -Convention**
**PDG Pratap Puranik**

Venue **Hotel Vrushali,**
6th floor, pool side,

**• Happy Birthday**

| | |
|---|---|
| Rtn. Jitendra Patil | 03 Aug |
| Rtn. Mahendra Parmar | 06 Aug |
| Rtn. Sanjay Patil | 07 Aug |
| Rtn. Vinay Chogule | 10 Aug |
| Rtn. Ramesh Hirave | 10 Aug |






R.I. PRESIDENT
**Rtn. Barry Rassin**

DIST. GOVERNOR
**Rtn. CA. Ravikiran Kulkarni**

PRESIDENT
**Rtn. Amit Mate**
Cell: 9422614119
Email: ameetmate@gmail.com

SECRETARY
**Rtn. Dr. Menghraj Chugh**
Cell: 9890681200
Email: grm611@gmail.com

BULLETIN EDITOR
**Rtn. Sameer Waykool**
Cell: 9860849533
Email: kedar.arts@gmail.com

JT. BULLETIN EDITOR
**Rtn. Jitendra Parte**
Cell: 9822194822
Email:jitu-160372@yahoo.com

**ROTARY CLUB OF KOLHAPUR**
Collector Office Road, Nagala Park, Kolhapur - 416 003
Phone : 0231 - 2651444
**Website : www.rotarykolhapur.org**


**Visit : www.rotarykolhapur.org**



On 30th July Past President Rtn Mahesh Kulkarni took a meeting on his birthday at Hotel Vishwa from Lamborghani Group.



Blood Donation Camp at Bhudargad Tahsil Karyalay on 1st August. Total 86 bags collected.

Dear Rotarians ! take some time out to make new friends !
Attend weekly meetings. We Miss You..!

**Rtn. Govind Gundesha**
Attendance Co ordinator.



**Rtn. Barry Rassin**
R. I. President



**Rtn. CA. Ravikiran Kulkarni**
District Governor



**Rtn. Amit Mate**
President



**Rtn. Dr. Menghraj Chugh**
Secretary

# ROTARY CLUB OF KOLHAPUR


• Dist.: **3170** • Club No.: **15655** • Charter No.: **5685** • Charter Date: **01-11-1943** •


# HERALD

## WEEKLY BULLETIN 2018-19


**ISSUE NO. : 5** **DATE : 8/8/2018**





ऑगस्ट महिन्यातील पहिल्या मिटींगचे वक्ते होते, घाटगे पाटील इंडस्ट्रिजचे चेअरमन आणि मॅनेजींग डायरेक्टर श्री किरण जयकुमार पाटील.प्रिझन रिफॉर्म्स हा त्यांचा विषय होता. त्यांची ओळख करुन दिली रो. मोहन गरगटे यांनी.

rotarykolhapur@gmail.com

श्री. पाटील यांनी सुरतकलहून बी.ई. मॅकेनीकल केले आहे.अमेरिकेतून एम.एस. व एम.बी.ए. केले आहे.क्रोमेमको या अमेरिकन कंपनीतून त्यांनी करियरची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी घाटगे पाटील इंडस्ट्रिज मध्येएक्झिक्युटीव्ह असिस्टंट टू चेअरमन असा आपला प्रवास सुरु केला.कंपनीचा २००८ मधील ७४ कोटी टर्नओव्हर त्यांच्या नेतृत्व कौशल्याने २०१८ मध्ये ६५० कोटीपर्यंत पोहोचला. कंपनीचा एक्सपोर्ट १५ कोटींवरुन १३४ कोटींपर्यंत त्यांनी नेला. १०,००० टन्स पर मंथ कॅपॅसिटीचे फाऊंड्री युनीट भारतातील अग्रगण्य कंपन्यांपैकी एक आहे.

मॉरिशसला फिरायला गेले असताना, एका मोठ्या प्रोजेक्टवर अनेक चायनीज वर्कर टॅग लाऊन काम करत होते. चौकशी केल्यावर कळाले की ते कैदी असून कोणताही मोबदला न देता त्याच्याकडून काम करुन घेण्यात येत होते. हे पाहिल्यावर श्री. पाटील यांना देखील आपल्या देशातसुद्धा थोडे स्वरुप बदलून असे करावे, असे वाटले. महाराष्ट्र स्टेट प्रिझन अथॉरिटी कडे त्यांनी ही कल्पना मांडली. असिस्टंट डीआयजी स्वाती साठे यांनी होकार दिला आणि पॉलिटेक्नीक कॉलेज, कळंबा जेल व घाटगे पाटील इंडस्ट्रिज यांच्या पुढाकाराने एका नवीन प्रयोगाची सुरुवात झाली. तुरुंगातील २० हजार स्वेअर फूट जागेचा वापर फेटलींग या ऑपरेशनसाठी करायचे ठरले.

४० ते ५० टन फेटलींग (कास्टींग मधील अतिरीक्त भाग कटर ग्राईंडरच्या सहाय्याने काढून टाकणे) एका दिवसात केले जाते. १ तासाचे क्लासरुम ट्रेनिंगही दिले जाते. ४ आठवडे काम केल्यावर एक आठवडयाची शिक्षा कमी होत असल्याने कैद्यांचाही ओघ वाढला आहे. ट्रेनिंग पूर्ण करणाऱ्यांना सर्टिफिकेट दिले जाते व ५५ रुपये प्रती दिवसाच्या तुरुंगात उपलब्ध असणाऱ्या वस्तुही त्यांना घेता येतात. कोणतेही ध्येय नसणाऱ्या या कैद्यांना या उपक्रमामुळे एक नवीन दिशा व जगण्याची उमेद मिळाली आहे. कोल्हापूरातील बाकीच्या कारखानदारांना देखील असा उपक्रम करण्याचे त्यांनी आवाहन केले आहे. यानंतर अंबाबाईच्या देवळात लागणारे प्रसादाचे लाडू देखील कैद्यांकडून बनवून घ्यायला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात १२ तुरुंग व ३०,००० कैदी आहेत त्यांचं पुर्नवसन अशा उपक्रमातून नक्की करता येईल, असे पाटील यांनी सांगितले.मिटींगला उपस्थिती चांगली होती. आयपीपी सुभाष कुत्ते यांनी आभार मानले.

लकी रोटेरियन ठरले, रो. भूषण जाजल.

## Strategic plan

Rotary's strategic plan ensures that our future is as strong as our past. The plan unifies the direction of Rotary International and The Rotary Foundation and identifies three strategic priorities supported by 16 goals.

Strategic plan

Rotary's strategic plan provides the framework for our future, ensuring that we continue to be known as a respected, dynamic organization that advances communities worldwide.

The strategic plan evolves with the aspirations of Rotarians. It is shaped by regular input from members through surveys, focus groups, committees, and meetings, so it can continue to help us achieve our goals.

**Rtn. V. N. Deshpande**

Strategic plan Commitee Chairman

| Designated Month | Activity |
|---|---|
| Jan | Vocational Service Month |
| Feb | Peace and Conflict Prevention/Resolution Month |
| | Rotary's Anniversary: World Understanding and Peace Day 23 |
| Mar | Water and Sanitation Month |
| | World Rotaract Week 12-18 March |
| Apr | Maternal and Child Health Month |
| May | Youth Service Month |
| June | Rotary Fellowships Month |

### Rotary

..... is a global network of 1.2 million neighbors, friends, leaders and problem-solvers who see a world where people unite and take action to create lasting change - across the globe,in our communities and in ourselves.

### गुरुपौर्णिमा



Rotary Club Of Kolhapur, रोटरी समाजसेवा केंद्र संचलित, कै. कमलाकर वामन नेवगी रोटरी कर्णबधिर शिशु विद्यालयमध्ये गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. शाळेतील सर्व पालकांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. विद्यार्थी व पालकांनी शिक्षकांना फुले व छोटीसी भेटवस्तु देऊन त्यांच्याप्रती आदर व्यक्त केला तसेच शिक्षक व पालकांनी मनोगत व्यक्त केले.

शिक्षक व पालकांच्या मार्गदर्शनासाठी आदरणीय मंगला अभ्यंकर आणि स्नेहल सप्रे आवर्जुन निमंत्रीत होत्या. शाळेच्या स्थापनेनंतरच्या काळात प्रथम विशेष शिक्षिका म्हणून मंगला अभ्यंकर शाळेतील पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी अत्यंत अल्प मानधनात सामाजिक काम या दृष्टिकोनातून येत असत.

गुरुपौर्णिमेच्या निमित्तान त्यांनी गरजू विद्यार्थ्यांना श्रवणयंत्रासाठी मदत म्हणून रु. २१,०००/- ची अमूल्य देणगी दिली. सामाजिक ऋणातून उतराई होण्याचा त्यांचा हा वसा आपणां सर्वांनाच स्पृहणीय व अनुकरणीय आहे.